पारनेर दर्शन

वर्ष ४ , अंक २२६, शुक्रवार, १३ नोव्हेंबर २०२६ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये



खा.लंके भट्टीतून तावून सुलाखून निघालेले नेतृत्व!

- बाळासाहेब थोरात यांच्याकडून खासदार नीलेश लंके यांचे कौतुक
- लंके यांच्यातील ऊर्जा जनतेच्या प्रेमातून येते; हंगा येथील दिवाळी स्नेहमेळाव्यात थोरातांची हजेरी
- आता लंके यांनी आणखी पुढे गेले पाहिजे; थोरातांचा हंगा येथून कानमंत्र
- संकटाच्या काळात जनतेच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचे आवाहन

लंके यांच्या ऊर्जेमागे जनतेचे प्रेम

खासदार नीलेश लंके आणि त्यांच्या सहकाऱ्यांची मेहनत, कष्ट आणि माणसे जोडून ठेवण्याची हातोटी कौतुकास्पद आहे. त्यांच्या संघर्षाला मर्यादा नाही. किती संघर्ष करावा, तरीही थकायचे नाही, ही ऊर्जा येते कुठून? मला जनमानसाची माहिती आहे. मीही राजकारणात आहे. एखाद्या व्यक्तिमत्त्वाला एवढी ऊर्जा मिळते, ती जनतेच्या प्रेमातूनच मिळते. नगरच्या कार्यक्रमातून निघताना चार जणांना गर्दीतून लंके यांना अक्षरशः ओढून बाहेर काढावे लागले. ज्या मातीतून हे नेतृत्व तयार झाले, त्या संघर्षाच्या कसोट्यांमधून ते पुढे आले आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि नेतृत्व कसदार आहे, असे थोरात यांनी नमूद केले.लंके यांच्या निवडणुकांमधील संघर्षाच्या अनेक कथा ऐकायला मिळतात. त्यांनी निवडणुकीत किती त्रास सहन केला, किती अडचणींना सामोरे गेले, हे सर्वांना माहिती आहे. या संघर्षावर पुस्तक लिहिले तर त्यातून अनेक शिष्य तयार होतील. मात्र, पुस्तकाच्या भानगडीत पडू नका, अशी मिश्किल टिप्पणीही थोरात यांनी केली.



लोकांसाठी काम करायचे असेल तर स्वत:ची काळजी घ्या

खासदार लंके यांच्या कामाचे कौतुक करतानाच थोरात यांनी त्यांना आरोग्याची काळजी घेण्याचा सल्लाही दिला. ते म्हणाले, मी कौतुक करतो म्हणून तुम्ही आणखी पळत सुटू नका. मेहनत आणि कष्ट करावेच लागतात; मात्र वेळच्या वेळी जेवणे, किमान पाच ते सहा तास झोप घेणे आणि स्वतःच्या तब्येतीकडे लक्ष देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. कारण तुम्हाला लोकांसाठी काम करायचे असेल, तर आधी स्वतःची काळजी घेतली पाहिजे. आरोग्य चांगले असेल तरच जनतेसाठी अधिक चांगल्या पद्धतीने काम करता येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. या स्नेहमेळाव्यास खासदार नीलेश लंके यांच्यासह बाबासाहेब भोस, सीताराम काकडे, दीपक लंके, मधुकर राळेभात, सूर्यकांत मोरे, रवींद्र राजदेव, मारुती रेपाळे, अर्जुन भालेकर, मोहन रोकडे, रामेश्वर निमसे, ॲड. राहुल झावरे, कारभारी पोटघन, दादा शिंदे, सरपंच राजू शिंदे, संतोष खामकर, द. मा. ठुबे, दत्तात्रय वारे, अभयसिंह नांगरे, बापू चत्तर, ज्ञानदेव लंके यांच्यासह हजारो मान्यवर, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

हंगा : सुदेश आबुज

खासदार नीलेश लंके यांच्या राजकीय आणि सामाजिक संघर्षाची दखल घेत माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी त्यांच्या नेतृत्वाचे भरभरून कौतुक केले. 'तुमच्या निवडणुका, तुमची मेहनत, तुम्ही पाहिलेली संकटे मला सगळी माहिती आहेत. या सगळ्या संघर्षातून तुम्ही तावून सुलाखून निघाले आहात. आता भट्टीतून बाहेर पडलेले हे नेतृत्व अधिक पुढे गेले पाहिजे,' अशा शब्दांत थोरात यांनी लंके यांच्या नेतृत्वाचे कौतुक केले. हंगा येथे खासदार नीलेश लंके यांनी गुरुवारी (ता. १२) दिवाळीनिमित्त आयोजित Wकेलेल्या स्नेहमेळाव्यात ते बोलत होते. यावेळी थोरात यांनी लंके यांच्या जनसंपर्क, कार्यपद्धती आणि जनतेसाठी अहोरात्र सुरू असलेल्या धावपळीचा उल्लेख करत त्यांच्या कामाचे विविध पैलू उलगडले. त्याचवेळी मिश्किल टिप्पणी करत उपस्थितांमध्ये हास्याची लकेरही उमटवली.

सहा विधानसभा मतदारसंघ सांभाळणे सोपे नाही! : थोरात म्हणाले, नीलेश लंके यांच्याकडे पाहिल्यानंतर एक अभूतपूर्व आणि वेगळे व्यक्तिमत्त्व कसे असते, याची जाणीव होते. नगरहून येताना मी विचारले की, तुला हे सगळे कसे जमते? त्यावर 'जमू बाबा' एवढेच उत्तर मिळाले. कारण माणसाला विश्रांतीच नाही. रात्रंदिवस ते जनतेसाठी धावत असतात. आम्हीही आमच्या काळात जनतेसाठी धावलो असू; परंतु लंके यांच्याइतके नाही. हे झोपत नाहीत आणि थकतही नाहीत. कोणत्या एनर्जीची गोळी घेतात, ते तरी त्यांनी सर्वांना सांगावे, अशी मिश्किल टिप्पणी त्यांनी केली. मी स्वतः ४० वर्षे विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले आहे. सुख-दुःखाच्या कार्यक्रमांना उपस्थित राहताना आमची दमछाक होत असे. मात्र, खासदार लंके यांच्याकडे सहा विधानसभा मतदारसंघांची जबाबदारी आहे. एका विधानसभा मतदारसंघात काम करतानाही माणूस दमतो, सरपंचालाही स्वतःच्या गावात काम करताना दमछाक होते. अशा परिस्थितीत सहा विधानसभा मतदारसंघ सांभाळणे आणि प्रत्येक ठिकाणी लोकांपर्यंत पोहोचणे ही सोपी गोष्ट नाही. तरीही कुठेही गेले तरी उर्वरीत पान ३ वर

काँग्रेसच्या 'फेक नॅरेटिव्ह'ला रस्त्यावर उतरून उत्तर देणार!

भाजपचा 16 नोव्हेंबरला अहिल्यानगरमध्ये 'लोकतंत्र बचाव, भीडतंत्र हटाव' मोर्चा

अहिल्यानगर : प्रतिनिधी



काँग्रेस पक्षाकडून देशात जाणीवपूर्वक फेक नॅरेटिव्ह निर्माण करून जनतेची दिशाभूल केली जात असल्याचा आरोप करत भारतीय जनता पक्षाने आता या प्रचाराला रस्त्यावर उतरून प्रत्युत्तर देण्याची तयारी केली आहे. भाजपच्या वतीने येत्या १६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी पाच वाजता अहिल्यानगर शहरात 'लोकतंत्र बचाव, भीडतंत्र हटाव' मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चाच्या माध्यमातून काँग्रेसच्या कथित खोट्या प्रचाराचा पर्दाफाश केला जाईल, अशी माहिती जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

मोर्चाच्या नियोजनासाठी आयोजित करण्यात आलेल्या भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठकीत ते बोलत होते. या वेळी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, शहराध्यक्ष अनिल मोहिते, बाबासाहेब वाकळे, निखिल वारे, विनायक देशमुख, प्रा. विश्वनाथ कोरडे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

मंत्री विखे पाटील म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बदनाम करण्याच्या एकमेव उद्देशाने काँग्रेसने देशात अराजक निर्माण करण्याचा प्रयत्न चालविला आहे. काँग्रेसचे नेते राहुल गांधी हातात संविधान घेतात; मात्र संविधानाचा सन्मान करण्याची त्यांची भूमिका दिसत नाही. कोणत्याही प्रश्नावर संसदेत चर्चा करण्याची त्यांची मानसिकता नाही. कारण संसदेत वस्तुस्थिती मांडावी लागते. त्यामुळे केवळ फेक नॅरेटिव्ह पसरवून देशात संभ्रम आणि गोंधळ निर्माण करण्याचे काम सुरू आहे.

जनतेमध्ये बुद्धिभेद करून राजकीय वातावरण दूषित करण्याचे प्रयत्न काँग्रेसकडून होत असल्याची टीका त्यांनी केली. सलग तीन निवडणुकांमध्ये पराभव होऊनही काँग्रेस नेतृत्वाला वास्तवाचे भान आलेले नाही. काही राज्यांमध्ये निवडणुकीत यश मिळाले की ईव्हीएम चांगले असल्याचे सांगायचे आणि पराभव झाला की निवडणूक आयोग तसेच एसआयआर प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करायचे, हा काँग्रेसचा दुटप्पीपणा असल्याचे विखे पाटील म्हणाले.

सीजेपीला पुढे करून काँग्रेस स्वतःची राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोपही त्यांनी केला. सोनिया गांधी यांचे आत्मचरित्र म्हणजे त्यांना उशिरा सुचलेले शहाणपण आहे. आणीबाणीच्या घटनेला पन्नास वर्षे पूर्ण झाल्यानंतर आता त्यावर भाष्य करण्याची आठवण झाली. अशा प्रकारच्या विधानांमधून जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्याचे काम सुरू असल्याची टीकाही त्यांनी केली.

सभापती राम शिंदे यांनी केंद्र व राज्य सरकारच्या कामकाजाचे कौतुक करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील बारा वर्षांच्या कारकिर्दीत भ्रष्टाचाराचा एकही आरोप सिद्ध झालेला नसल्याचे सांगितले. देशातील जनतेला अभिमान आणि स्वाभिमान वाटेल, असे काम सरकारच्या माध्यमातून सुरू असल्याचे ते म्हणाले.

लोकसभा निवडणुकीच्या वेळी संविधान बदलले जाणार असल्याच्या अफवा पसरवून जनतेची दिशाभूल करण्यात आली. संसदेच्या सभागृहात कोणत्याही विषयावर चर्चा करण्याची काँग्रेस नेत्यांची तयारी नसते. त्यामुळे त्यांच्या रस्त्यावरच्या लढाईला भाजप उर्वरीत पान ३ वर

हॉटेल सुप्रिमजवळ गावठी कट्ट्यासह तरुण जेरबंद

सुपा पोलिसांची कारवाई; 15 हजारांचा गावठी कट्टा आणि जिवंत काडतूस जप्त

सुपा : प्रतिनिधी

अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधात सुपा पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला असून, वाडेगव्हाण शिवारातील हॉटेल सुप्रिमजवळ गावठी कट्टा आणि जिवंत काडतूस बाळगणाऱ्या एका २० वर्षीय तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतले. प्रणव बाळासाहेब अलभर (वय २०, रा. देवदैठण, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर) असे ताब्यात घेतलेल्या तरुणाचे नाव आहे. त्याच्याकडून अंदाजे १५ हजार रुपये किमतीचा गावठी कट्टा आणि ६० रुपये किमतीचे एक जिवंत काडतूस जप्त करण्यात आले. या कारवाईमुळे परिसरात अवैध शस्त्रे बाळगणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवार (ता. ११) रोजी सुपा पोलीस ठाण्याचे पथक परिसरात गस्त घालत असताना पोलीस अंमलदारांना गुप्त बातमीदारामार्फत वाडेगव्हाण शिवारातील हॉटेल सुप्रिमजवळ एक तरुण संशयास्पदरीत्या गावठी कट्टा बाळगून असल्याची माहिती मिळाली. या माहितीची गांभीर्याने दखल घेत पोलिसांनी तातडीने पंचांना सोबत घेऊन संबंधित ठिकाणी धाव घेतली. पोलिसांनी परिसरात सापळा रचून संशयित तरुणाला ताब्यात घेतले.

त्यानंतर पंचांसमक्ष त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे काळ्या रंगाची प्लास्टिकची मूठ आणि लोखंडी मॅगझीन असलेला अंदाजे १५ हजार रुपये किमतीचा गावठी कट्टा आढळून आला. तसेच त्याच्या पॅन्टच्या खिशात एक जिवंत काडतूस मिळाले. पोलिसांनी गावठी कट्टा उर्वरीत पान ३ वर

जिल्हा बँकेत नीलेश लंकेंची पहिली एन्ट्री लक्षवेधी

मानधनाचे पाकीटही नम्रपणे नाकारले!; विजयानंतर जिल्हा बँकेच्या बैठकीला उपस्थिती

प्रोसिडिंग बुकवर स्वाक्षरी करून लंके रवाना; विखे समर्थकांचा पराभव केल्यानंतर पुन्हा चर्चेत

अहिल्यानगर : प्रतिनिधी



जिल्हा सहकारी बँकेच्या अध्यक्ष व उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी खासदार नीलेश लंके यांची जिल्हा बँकेतील पहिलीच एन्ट्री लक्षवेधी ठरली. पारनेर सोसायटी मतदारसंघाचे प्रतिनिधी म्हणून खासदार लंके गुरुवारी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास संचालक मंडळाच्या बैठकीसाठी उपस्थित राहिले. त्यांनी बैठकीच्या प्रोसिडिंग बुकवर स्वाक्षरी केली आणि त्यानंतर तेथून निघून गेले. विशेष म्हणजे, स्वाक्षरीनंतर संबंधित अधिकाऱ्याने त्यांना संचालक म्हणून देय असलेले मानधनाचे पाकीट देऊ केले. मात्र, खासदार लंके यांनी दोन्ही हात जोडून नम्रपणे मानधन स्वीकारण्यास नकार दिला. त्यांच्या या कृतीची बँकेच्या वर्तुळात विशेष चर्चा रंगली.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत पारनेर सोसायटी मतदारसंघातील लढत संपूर्ण जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष वेधणारी ठरली होती. या अटीतटीच्या लढतीत खासदार नीलेश लंके यांनी माजी खासदार डॉ. सुजय विखे यांचे समर्थक राहुल शिंदे पाटील यांचा तब्बल २४ मतांनी पराभव केला. खासदार लंके यांना ६४ मते मिळाली, तर शिंदे पाटील यांना ४० मतांवर समाधान मानावे लागले. या विजयातून लंके यांनी पारनेर तालुक्यातील आपले राजकीय वर्चस्व पुन्हा एकदा अधोरेखित केले.

या निवडणुकीत स्वतः डॉ. सुजय विखे यांनी लक्ष घातल्याने सुरुवातीपासूनच राजकीय प्रतिष्ठेची लढाई निर्माण झाली होती. अगदी सहलीवर पाठविण्यात आलेले मतदारही विखे समर्थकांच्या संपर्कात असल्याची चर्चा होती. त्यामुळे ही लढत केवळ लंके विरुद्ध शिंदे पाटील अशी मर्यादित न राहता अप्रत्यक्षपणे खासदार नीलेश लंके विरुद्ध माजी खासदार डॉ. सुजय विखे अशीच बनली होती.

जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याच्या प्रक्रियेत डॉ. विखे यांनी जिल्ह्यातील विविध पक्षांच्या नेत्यांना एका व्यासपीठावर आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. या प्रक्रियेत खासदार लंके यांना बाजूला ठेवण्यात आल्याची राजकीय चर्चा होती. मात्र, या सर्व घडामोडींनंतरही लंके यांनी पारनेर मतदारसंघातील लढतीत आपले राजकीय कसब पणाला लावत विजय मिळविला. २४ मतांच्या फरकाने मिळविलेल्या या विजयाने विखे समर्थकांना मोठा धक्का बसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात उर्वरीत पान ३ वर



फॅशन|संसार|सौंदर्य
सखी

मसूर दाळीत मिसळा तांदूळ, दही, मध...

खोलवरची घाण अक्षरशः ओढून काढेल, चेहऱ्यावर आणेल चमक!

प्रत्येकालाच आपली त्वचा चमकदार दिसावी असे वाटते. हे साध्य करण्यासाठी, ते त्यांच्या चेहऱ्यावर विविध उत्पादने आणि उपचार वापरतात. आता, तुमचा चेहरा किती आणि किती काळ चमकेल हे तुमच्या बजेटवर अवलंबून आहे. कारण एक सामान्य फेअरनेस क्रीम देखील तुम्ही लावता तोपर्यंत गोरी बनवते. ती वापरणे बंद करता तेव्हा पुन्हा आधीसारखा दिसायला लागतो. त्यामुळे ही उत्पादने वापरत राहावी लागतात. आम्ही तुम्हाला सांगू इच्छितो की तुम्ही तुमच्या त्वचेत कायमस्वरूपी चमक मिळवू शकता. जितकी घाण चेहऱ्यावर साचलेली आहे आणि चेहरा धुळीमुळे काळवंडलेला आहे. ती अक्षरशः खेचून बाहेर काढण्याचाही उपाय आहे. रसायनयुक्त उत्पादने तुमच्या त्वचेला हानी पोहोचवू शकतात. त्यामुळे नैसर्गिक अन् घरगुती उपाय अंमलात आणण्याचा सल्ला आम्ही देत आहोत.





नैसर्गिक घरगुती उपाय तुम्ही वापरा. आम्ही जी रेसिपी शेअर करणार आहोत ती कंटेंट क्रिएटर प्रियांका रे यांनी तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर शेअर केली आहे. तिच्या व्हिडिओमध्ये, तिने स्पष्ट केले की तिच्या रेसिपीचा वापर केल्याने घाण आणि मृत त्वचेच्या पेशी निघून जातात. मसूर, तांदूळ, दही, मध हे घटक तिने घेतले. प्रथम मसूर आणि तांदूळ दोन्ही वेगवेगळ्या डब्यात रात्रभर भिजवा. नंतर, त्यांना मिक्सरमध्ये बारीक करून पेस्ट बनवा. आता, या पेस्टमध्ये दही आणि मध घाला. ते तुमच्या चेहऱ्यावर १५ ते २० मिनिटे लावा. काढताना, तुमच्या बोटांना ओले करा आणि त्यांना गोलाकार हालचालीत घासून घ्या. यामुळे तुमचा चेहरा पूर्णपणे एक्सफोलिएट होईल. नंतर, तुमचा चेहरा कोमट पाण्याने स्वच्छ धुवा आणि नंतर तुमच्या चेहऱ्यावर गुलाबजल लावा.

- मसूरचे फायदे : मसूर खाणे आरोग्यासाठी फायदेशीर आहे. ते चेहऱ्यावर लावल्याने तुमची त्वचा सुंदर वाटते. त्यात नैसर्गिक व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स असतात. ते त्वचेला हळूवारपणे एक्सफोलिएट करते आणि उजळ करते. यामुळे मृत पेशी काढून टाकण्यास आणि मुरुम कमी करण्यास मदत होते, परिणामी रंग चमकदार होतो.
- तांदळाचे फायदे : हे लक्षात घेण्यासारखे आहे की तांदळात फेरुलिक ॲसिड असते, जे एक शक्तिशाली अँटीऑक्सिडंट असते. त्यात नैसर्गिक स्टार्च देखील असतो, जो त्वचेला आराम देतो. मॅट लूक देतो आणि रंग एकसारखा करतो. एकंदरीत, तांदूळ त्वचेच्या काळजीचा एक आवश्यक भाग आहे.
- दह्याचे फायदे : दह्यामध्ये प्रोबायोटिक-समृद्ध लॅक्टिक ॲसिड असते, जे त्वचेला खोलवर हायड्रेट करते. ते पिगमेंटेशन कमी करण्यास मदत करते. याव्यतिरिक्त, त्वचेला हायड्रेट करण्यास मदत करते. ते ओलावा टिकवून ठेवते आणि त्वचा नैसर्गिकरित्या चमकदार दिसते.
- मधाचे फायदे : मध त्वचेच्या काळजीचा एक महत्त्वाचा भाग आहे. ते त्वचा मऊ आणि चमकदार बनवू शकते. ते त्वचा निरोगी आणि मॉइश्चरायझ ठेवते. ते तुमचा नैसर्गिक रंग उजळण्यास देखील मदत करते.



मुलतानी माती मुरुमांपासून मुक्ती?

मुलतानी माती ही त्वचेच्या काळजीचा एक अतिशय महत्त्वाचा भाग मानली जाते. जेव्हा जेव्हा फेस मास्क किंवा स्क्रबचा विचार येतो तेव्हा लोक त्यात नेहमीच मुलतानी माती मिळवतात. जेव्हा लोकांना दुसरे काहीही सापडत नाही, तेव्हा ते फक्त मुलतानी माती ओली करतात आणि त्वचेची काळजी घेण्याच्या नावाखाली चेहऱ्यावर लावतात. यामुळे प्रश्न निर्माण होतो, की मुलतानी माती खरोखर फायदेशीर आहे का? आपण सर्वजण असा विश्वास ठेवतो की नैसर्गिक काहीही आरोग्यदायी आहे आणि आपल्याला किंवा आपल्या त्वचेला हानी पोहोचवत नाही. पण हा विश्वास नेहमीच खरा नसतो. असे नाही की आपण मुलतानी मातीला आपल्या त्वचेसाठी हानिकारक म्हणतो, कारण प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात...

- डॉक्टरांनी सत्य उघड केले : मुलतानी मातीचे दोन्ही पैलू समजून घेणे आणि ती योग्यरित्या कशी वापरावी हे समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अशा प्रकारे, आपण त्वचेचे नुकसान टाळू शकतो. खरं तर, तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की अनेक प्रकरणांमध्ये, मुलतानी माती वापरल्याने त्वचा सुधारत नाही, उलट ती खराब होते. बरेच लोक ओल्या मुलतानी मातीला मुरुमांवर किंवा चेहऱ्यावरील मुरुमांवर लावतात. त्यांचा असा विश्वास आहे की मुलतानी माती हा मुरुमांवर सर्वोत्तम उपाय आहे. त्वचारोगतज्ञांकडून जाणून घेऊ मुलतानी माती मुरुमांपासून मुक्त होण्यास मदत करू शकते का.
- मुरुमांवर कसे कार्य करते? : त्वचारोग तज्ञांच्या मते, मुलतानी माती चेहऱ्याला उजळवते आणि मृत पेशींना काढून टाकते. तथापि, मुरुमांवर थेट लावल्याने ते पूर्णपणे काढून टाकता येत नाही. मुरुम-प्रवण आणि तेलकट त्वचेसाठी ते फायदेशीर आहे, परंतु ते मुरुमांना कमी करणार नाही. केवळ मुलतानी माती मुरुमांवर उपचार करू शकत नाही. जर तुम्ही मुरुमांवर उपचार घेत असाल, तर तुमच्या चेहऱ्यावर मुलतानी माती वापरणे टाळा. त्यामुळे स्थिती आणखी बिघडू शकते.
- मुलतानी माती चेहऱ्यावर लावण्याचे फायदे : उपलब्ध माहितीनुसार, मुलतानी माती चेहऱ्यावर लावल्याने त्वचेवरील अतिरिक्त तेल आणि घाण काढून छिद्रे साफ होतात. यामुळे मुरुमे आणि ब्लॅकहेड्स कमी होऊ शकतात. ही माती चेहरा थंड करते आणि त्वचेची जळजळ शांत करते. त्यात नैसर्गिक खनिजे असतात जी त्वचेला उजळवतात आणि रंग सुधारतात.

मुलतानी माती कशी वापरावी?

मुलतानी माती ७० ते ८०% सुकेपर्यंत तुमच्या चेहऱ्यावर ठेवावी. त्यानंतर, पाण्याने स्वच्छ धुवा. हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की तुमचा चेहरा उजळवण्यासाठी मुलतानी माती पूर्णपणे सुकू देऊ नये. जर तुम्ही ती पूर्णपणे सुकल्यानंतर काढली तर तुमच्या चेहऱ्यावर वृद्धत्वाची चिन्हे दिसू शकतात. शिवाय, तुम्ही ती फक्त एकदाच वापरावी. तुम्ही कधीही एकापेक्षा जास्त वेळा मुलतानी माती लावू नये. एकूणच, तुम्ही चेहऱ्याच्या समस्यांसाठी मुलतानी माती वापरू शकता, परंतु ती केवळ मुरुमांवर काम करणार नाही.



चमकदार त्वचेचा स्लगिंग ट्रेंड काय आहे?

दिल्लीत जन्मलेली मीरा राजपूत तिच्या सौंदर्याने, शैलीने आणि व्यक्तिमत्त्वाने सर्वांना मोहीत करते. बॉलिवूडचा चॉकलेट बॉय शाहिद कपूरही तर तिच्यावर असा लट्टू झाला, की तिला जन्मोजन्माची साथी बनवले. मात्र आज लोक मीराला फक्त शाहिद कपूरची पत्नी म्हणून पाहत नाहीत, तर तिने बॉलिवूड आणि देशात स्वतःसाठी एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. लोक अनेकदा तिला विचारतात, की तिच्या विनाडाग आणि चमकदार त्वचेचे रहस्य काय आहे. प्रत्येक स्त्रीला मीरासारखे सुंदर दिसायचे आहे. मीराच्या सौंदर्याचे रहस्य काय आहे ते जाणून घेऊया...

मीरा इतकी सुंदर कशी दिसते?

मीरा राजपूतने एका मुलाखतीत सांगितले, की ती तिच्या त्वचेची काळजी घेण्यासाठी दररोज रात्री स्लगिंग करते. स्लगिंग हा एक स्किनकेअर ट्रेंड आहे; या ट्रेंडचे अनुसरण करण्यासाठी तुम्हाला तुमच्या रेफ्रिजरेटरमधून फक्त एक गोष्ट हवी आहे. ती चेहऱ्यावर लावल्याने तिची त्वचा सुधारते. आता, स्लगिंग म्हणजे काय आणि त्याचा त्वचेला फायदा होतो का ते जाणून घेऊया...



- स्लगिंग म्हणजे काय? : स्लगिंग हा स्किनकेअर ट्रेंड कोरियामध्ये उगम पावला आणि हळूहळू जगभरात पसरत आहे. हा ट्रेंड समजून घेण्यासाठी स्लगिंगमध्ये रात्रीच्या वेळी संपूर्ण चेहऱ्यावर पेट्रोलियम जेलीचा जाड थर लावणे समाविष्ट आहे. ते रात्रभर लावून ठेवून सकाळी ते काढून टाकायचे. हे त्वचेतील ओलावा टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे त्वचा चमकदार होते. लोकांचा असा विश्वास आहे, की स्लगिंगमुळे त्वचा खोलवर हायड्रेट होते आणि ओलावा टिकून राहण्यास मदत होते.
- डॉक्टरांनी काय म्हटले? : डॉक्टरांच्या मते, चमकदार चेहरा मिळविण्यासाठी तुम्ही कोणत्याही ट्रेंडचे आंधळेपणाने अनुसरण करू शकत नाही. त्वचारोगतज्ञ प्रियांका रेड्डी यांनी एका व्हिडिओमध्ये सांगितले की स्लगिंग ट्रेंड प्रत्येकाच्या त्वचेसाठी योग्य नाही. शिवाय, चेहऱ्यावर पेट्रोलियम जेली लावल्याने त्वचेला गंभीर नुकसान होऊ शकते. पेट्रोलियम जेली चेहऱ्याभोवती बांधलेल्या प्लास्टिकच्या पिशवीसारखे काम करते. ज्यामुळे त्वचेला श्वास घेण्यापासून रोखले जाते आणि छिद्र बंद होतात. म्हणून, रात्री पेट्रोलियम जेली लावणे टाळावे.
- ट्रेंड प्रत्येकाच्या त्वचेसाठी चांगले नाही : आपल्या सर्वांच्या त्वचेचे प्रकार खूप वेगळे आहेत. जर मीरा राजपूत किंवा इतर सेलिब्रिटी या उपचारांचा वापर करत असतील आणि फायदे अनुभवत असतील, तर याचा अर्थ असा नाही की तुम्ही ते तुमच्या चेहऱ्यावर आंधळेपणाने वापरून पहावे. वेगवेगळ्या त्वचेचे प्रकार आहेत. जर तुमची मुरुमांची समस्या किंवा तेलकट त्वचा असेल, तर तुमच्या चेहऱ्यावर पेट्रोलियम जेली लावल्याने गंभीर समस्या उद्भवू शकतात.

धूळयुक्त पंखा करा एका रुपयात स्वच्छ


शिडी किंवा स्टूलचीही गरज नाही...



धूळ आणि घाणीने झाकलेला पंखा केवळ घराचे स्वरूपच खराब करत नाही तर हवेच्या गुणवत्तेवरही परिणाम करतो. पंख्याची वारंवार साफसफाई करणे कठीण आहे आणि दीर्घकाळ दुर्लक्ष केल्याने घाण साचत राहते. छताच्या पंख्यापर्यंत पोहोचण्यासाठी अनेकदा शिडी किंवा स्टूलची आवश्यकता असते. तथापि, आता ही इतकी त्रासदायक गोष्ट राहणार नाही... एक सोपी घरगुती पद्धत आम्ही तुम्हाला सांगतो. पद्धत फक्त १ रुपयात आणि घरगुती साधनांनी तुमचा पंखा चमकू शकते. दिवाळीच्या स्वच्छतेमध्ये कोणतीही समस्या टाळण्यासाठी, ही पद्धत लक्षात ठेवा. जेणेकरून तुम्ही तुमचा पंखा नियमितपणे

- सर्वात आधी : पंखा साफ करण्यापूर्वी, सैल धूळ काढून टाका. पंख्यावर जमा झालेली जाड धूळ आणि जाळे साफ करण्यासाठी झाडू वापरा. झाडूचे लांब हँडल तुम्हाला पंख्यापर्यंत पोहोचण्यास मदत करते, ज्यामुळे शिडी चढण्याची गरज नाहीशी होते. धूळ काढून टाकल्याने पुढील साफसफाईचे काम सोपे होते.
- घरगुती क्लिनर बनवा : कोमट पाण्यात ॲंटासिड पावडर (ईनो) चे एक पॅकेट मिसळा आणि एक रुपयाचा शॅम्पू सॅशे घाला आणि पूर्णपणे मिसळा. ॲंटासिड पावडरमधील सायट्रिक ॲसिड आणि सोडियम बायकार्बोनेट, शॅम्पूच्या डिटर्जंट गुणधर्मांसह एकत्रितपणे एक शक्तिशाली फोमिंग सोल्यूशन तयार करतात. हे द्रावण स्प्रे बाटलीत ओता. हे द्रावण पंख्यावरील तेलकट आणि चिकट घाण सैल करते आणि सैल करते, ज्यामुळे ते साफसफाईसाठी तयार होते.
- साफसफाईची साधने : हँडलवाला स्क्रबर घ्या आणि प्लास्टिकच्या बाटलीचे झाकण कापून टाका. कापलेल्या झाकणाला दोन छिद्रे करा आणि स्क्रबरच्या हँडलला वायरने बांधा. झाकण वरच्या दिशेने असावे. कारण तेथे एक लांब पाईप किंवा रॉड जोडला जाईल. हे घरगुती साधन पंख्याच्या प्रत्येक कोपऱ्यात पोहोचण्यासाठी आणि ते घासण्यासाठी योग्य आहे; तुम्हाला शिडी, स्टूलची आवश्यकता नाही.
- स्वच्छता कशी करावी? : प्रथम, तयार केलेले द्रावण पंख्याच्या ब्लेडवर फवारून घ्या आणि ते काही वेळ घाणीवर राहू द्या. आता, पाईपला स्क्रबर लावलेल्या टूलचा वापर करा आणि पंख्याच्या ब्लेड हलक्या हाताने घासून घ्या. लांब हँडलमुळे तुम्ही जमिनीवर उभे राहून पंख्याचा मध्यभाग देखील स्वच्छ करू शकता.
- शेवटी पुसून टाका आणि चमकवा : अंतिम साफसफाईची पायरी म्हणजे पंखा चमकदार आणि डागरहित करण्यासाठी पुसणे. स्क्रबिंग केल्यानंतर, स्क्रबर टूलला स्वच्छ, कोरडे कापड घट्ट बांधा. पंख्याचे ब्लेड हलक्याहाताने पुसण्यासाठी कापडाचा वापर करा. हे पंखा

होमवर्क करण्यास टाळाटाळ करतेय मुलगा? शिका ३ गोल्डर रूल



काही मुले गृहपाठ वेळेवर पूर्ण करतात, परंतु काही पालकांना त्यांच्याकडून गृहपाठ करवून घेणे अवघड जाते. यामुळे अनेकदा शाळेतून तक्रारी येतात. पालक प्रशिक्षक पुष्पा शर्मा यांनी ही समस्या सोडवण्यासाठी महत्त्वाचे नियम सांगितले आहेत.

इंस्टाग्राम व्हिडिओमध्ये, पालक प्रशिक्षक पुष्पा शर्मा म्हणतात की जेव्हा तुमचे मूल गृहपाठ करण्यास नकार देते तेव्हा पालकांनी तीन महत्त्वाचे नियम पाळावेत. यामुळे मुलाचे नाही हे हो मध्ये बदलण्यास मदत होऊ शकते.

- मुलाचा दृष्टिकोन समजून घ्या : तज्ञ पुढे स्पष्ट करतात की पालकांनी प्रथम त्यांचे म्हणणे काळजीपूर्वक ऐकले पाहिजे. नंतर, अगदी शांतपणे म्हणा, ठीक आहे, जर तुला आता गृहपाठ करायचे नसेल तर ते ठीक आहे...
- थोडा वेळ थांबा आणि नंतर परत जा : प्रशिक्षक शिफारस करतात की पालकांनी थोडा वेळ थांबावे आणि त्यांच्या मुलाकडे परत जावे, त्यांच्या डोळ्यात पहावे आणि प्रेमाने विचारावे, तुम्ही हे १० मिनिटांत कराल की आता फक्त २ मिनिटांत?
- छोट्या टप्प्यात समजावून सांगा : तिसरा नियम म्हणजे अशा प्रकरणांमध्ये लहान पावले उचलणे. तुमच्या मुलाला प्रोत्साहनदायक स्वरात सांगा, चला, आधी फक्त दोन प्रश्न सोडवा किंवा अर्धा अध्याय वाचा, मग तुम्हाला तुमच्या अभ्यासादरम्यान २० मिनिटे मोकळा वेळ मिळेल. शिक्षक स्पष्ट करतात की जेव्हा मुलाला नियंत्रण आणि सांत्वन दोन्ही मिळते तेव्हा ते नाही वरून हो कडे लवकर वळतात. म्हणून

शॉर्ट न्यूज

आंतरराष्ट्रीय विमानसेवा मुंबईतच राहणार

■ **मुंबई :** विमानतळावरील १४ आंतरराष्ट्रीय विमानसेवा नवी मुंबई विमानतळावर हलविण्याच्या चर्चेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोध दर्शविला आहे. यासंदर्भात त्यांनी केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्र्यांना पत्र पाठविले आहे. मुंबई विमानतळाचे सध्याचे महत्त्व कायम ठेवण्याची भूमिका मुख्यमंत्र्यांनी मांडली आहे. त्यामुळे मुंबई विमानतळावरील आंतरराष्ट्रीय उड्डाणे सुरू राहण्याचा मार्ग स्पष्ट होण्याची शक्यता आहे. या निर्णयाकडे विमान प्रवासी आणि विमान कंपन्यांचे लक्ष लागले आहे.

स्वच्छतेत देशात अव्वल शहर

■ **नवी मुंबई :** स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ मध्ये नवी मुंबईने देशातील सर्वात स्वच्छ शहराचा बहुमान मिळविला आहे. यामुळे यापूर्वी सलग वर्चस्व राखणाऱ्या इंदूरची आघाडी संपुष्टात आली आहे. शहरातील स्वच्छता व्यवस्थापन आणि कचरा संकलनाच्या कामगिरीची या निमित्ताने दखल घेण्यात आली आहे. या यशामुळे नवी मुंबईच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. देशभरातून शहराचे कौतुक होत आहे.

धरणसाठा घसरला, पाणीचिंता वाढली

■ **नागपूर :** शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या महत्त्वाच्या तोतलाडोह धरणातील उपयुक्त पाणीसाठा २५ टक्क्यांवर घसरला आहे. त्यामुळे शहराच्या पाणीपुरवठ्याबाबत चिंता व्यक्त होत आहे. उन्हाळ्यापूर्वीच पाणीसाठ्यात घट झाल्याने प्रशासनासमोर आव्हान निर्माण झाले आहे. उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करण्याची गरज निर्माण झाली आहे. नागरिकांनीही पाण्याचा काटकसरीने वापर करण्याची आवश्यकता आहे.

शुल्क वसुली खासगी संस्थेकडे

■ **नाशिक :** महानगरपालिकेने शहरातील फेरीवाल्यांकडून शुल्क वसुलीचे काम खासगी संस्थेमार्फत करण्याची तयारी केली आहे. या माध्यमातून पुढील तीन वर्षांत ३६ कोटी ३५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. शहरातील फेरीवाला व्यवस्थापन अधिक शिस्तबद्ध करण्याचा प्रयत्न या निर्णयातून होणार आहे. शुल्क वसुलीची प्रक्रिया कशी राबविली जाणार, याकडे फेरीवाल्यांचे लक्ष लागले आहे. या निर्णयामुळे महापालिकेच्या उत्पन्नात वाढ होण्याची अपेक्षा आहे.

दृष्टिहीनांसाठी विद्यार्थ्यांचे विशेष ॲप

■ **पुणे :** पुण्यातील भारतीय माहिती तंत्रज्ञान संस्थेच्या विद्यार्थ्यांनी दृष्टिहीन व्यक्तींसाठी आवाजाच्या मार्गदर्शनावर आधारित पैसे भरण्याचे ॲप विकसित केले आहे. या ॲपच्या माध्यमातून आर्थिक व्यवहार अधिक सुलभ करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. मोबाईलवरील व्यवहार करताना दृष्टिहीन व्यक्तींना येणाऱ्या अडचणी कमी होण्यास मदत होणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा सामाजिक उपयोग करण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांचा हा उपक्रम महत्त्वपूर्ण मानला जात आहे. या संशोधनामुळे दिव्यांगांच्या डिजिटल व्यवहारांना नवी दिशा मिळण्याची अपेक्षा आहे.

अहिल्यानगरमध्ये ऊसदराचा तिढा कायम

मंत्री विखेंच्या अध्यक्षतेखालील दुसरी बैठकही निष्फळ; शेतकऱ्यांचा आंदोलनाचा इशारा

अहिल्यानगर : प्रतिनिधी

जिल्ह्यातील ऊसदराचा प्रश्न अद्याप मार्गी लागलेला नसून, ऊस उत्पादक शेतकरी आणि साखर कारखानदार यांच्यातील संघर्ष तीव्र होण्याची चिन्हे आहेत. ऊसदर निश्चित करण्यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली दुसरी बैठकही कोणत्याही ठोस निर्णयाविना संपली. त्यामुळे ऊसदराचा तिढा कायम असून शेतकरी संघटना अधिक आक्रमक झाल्या आहेत. ऊसदर निश्चित करण्याचे निर्देश विखे यांनी साखर कारखान्यांच्या चेअरमनना दिले आहेत. मात्र, या मुदतीत निर्णय न झाल्यास जिल्ह्यातील ऊसाचे काटे, साखर कारखाने आणि प्रमुख महामार्ग बंद पाडण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

ऊस गाळप हंगाम सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात ऊसदराचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य दर मिळावा, यासाठी शेतकरी संघटनांकडून सातत्याने मागणी केली जात आहे. दुसरीकडे साखर



कारखान्यांकडून ऊसदर निश्चित करण्याबाबत अद्याप एकमत झालेले नाही.

हा प्रश्न सोडवण्यासाठी प्रशासनाच्या पुढाकाराने पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. मात्र, दुसऱ्या बैठकीतही तोडगा निघू शकला नाही. या बैठकीला जिल्ह्यातील सर्व साखर कारखान्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणे अपेक्षित होते. मात्र, प्रत्यक्षात केवळ दोन ते तीन साखर कारखान्यांचे चेअरमन उपस्थित राहिल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे सर्व कारखान्यांशी चर्चा करून ऊसदराचा निर्णय घेण्यात अडचणी निर्माण झाल्या. कारखानदारांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने शेतकरी संघटनांमध्ये नाराजी वाढली आहे.

बैठकीत कोणताही ठोस निर्णय न झाल्याने शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात आक्रमक भूमिका घेतली. यावेळी जोरदार घोषणाबाजी करत त्यांनी आपला संताप व्यक्त केला. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या मागण्यांवर तातडीने निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली. वारंवार बैठका होऊनही ऊसदराचा प्रश्न मार्गी लागत नसेल, तर आंदोलनाशिवाय पर्याय उरणार नाही, अशी भूमिका शेतकरी संघटनांनी घेतली आहे.

भाऊबीजेनिमित्त सुनेत्रा पवार शेतकरी भगिनींच्या भेटीला

मूर्टीत महिलांसोबत पिठलं-भाकरीचा घेतला आस्वाद; शेती आणि कौटुंबिक प्रश्नांवर साधला संवाद

बारामती : प्रतिनिधी

दिवाळी भाऊबीजेच्या निमित्ताने राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी बारामती तालुक्यातील मूर्टी येथे शेतकरी भगिनींची भेट घेत त्यांच्यासोबत भाऊबीज साजरी के ली. यावेळी त्यांनी शेतकरी महिलांसोबत पारंपरिक पिठलं-भाकरीचा आस्वाद घेतला. साध्या आणि घरगुती वातावरणात झालेल्या या भेटीत त्यांनी महिलांशी मनमोकळा संवाद साधत त्यांच्या सुख-दुःखाची आस्थेने विचारपूस केली.

दिवाळी सणाच्या निमित्ताने सर्वत्र आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण असताना भाऊबीजेच्या दिवशी भाऊ-बहिणीच्या नात्यातील प्रेम, जिव्हाळा आणि आपुलकीला विशेष महत्त्व असते. याच पार्श्वभूमीवर



सुनेत्रा पवार यांनी मूर्टी येथील शेतकरी भगिनींची भेट घेत त्यांच्यासोबत काही वेळ घालवला. कोणताही औपचारिकपणा न ठेवता त्यांनी महिलांसोबत घरगुती जेवणाचा आनंद घेतला.

या भेटीदरम्यान त्यांनी शेतकरी महिलांशी संवाद साधत त्यांच्या शेतीविषयक समस्या जाणून घेतल्या. शेती करताना येणाऱ्या अडचणी, सध्याची शेतीची परिस्थिती, कुटुंबाची जबाबदारी आणि दैनंदिन जीवनातील आव्हाने याबाबत त्यांनी महिलांशी चर्चा केली. महिलांचे अनुभव जाणून घेत त्यांच्या अडचणींबाबतही त्यांनी आस्थेने विचारपूस केली.

राजकीय आणि प्रशासकीय जबाबदाऱ्यांमधून वेळ काढत सुनेत्रा पवार यांनी थेट शेतकरी भगिनींमध्ये मिसळून त्यांच्यासोबत भाऊबीज साजरी केली. पिठलं-भाकरीच्या साध्या जेवणातून आणि मनमोकळ्या संवादातून झालेली ही भेट आपुलकी, जिव्हाळा आणि साधेपणाचा अनुभव देणारी ठरली.

पान ४ वरून...

तालुक्यातील ऊस उत्पादकांना चार हजारांचा भाव द्या!

उतारा आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील साखर कारखान्यांचा साखर उतारा यामध्ये फारसा फरक नाही. त्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मिळणारा न्याय अहिल्यानगर जिल्ह्यातील ऊस उत्पादकांनाही मिळायला हवा, असे शितोळे यांनी म्हटले आहे.

मागील हंगामातील दरावर नाराजी; मागील गळीत हंगामात पारनेर साखर कारखान्याने प्रतिटन तीन हजार रुपये दिले असून, आणखी १०० रुपये देण्याचे सांगितले होते. तर पराग साखर कारखान्याने प्रतिटन तीन हजार २०० रुपये दर दिला. हे दर रास्त नसून काही कारखान्यांनी एफआरपीपेक्षाही कमी दर दिल्याचा आरोप शितोळे यांनी केला आहे. ऊसतोड सुरू झाल्यानंतर कारखानदार ठरवतील तो दर शेतकऱ्यांनी मुकाट्याने स्वीकारायचा, ही पद्धत आणखी किती वर्षे सुरू राहणार, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

खासदार लंके यांनाही निवेदन : ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या एफआरपीमध्ये वाढ करण्याबाबत संसदेत प्रश्न उपस्थित करावा, यासाठी अहिल्यानगरचे खासदार नीलेश लंके यांनाही स्वतंत्र निवेदन देण्यात आले आहे. सध्या सुशिक्षित तरुण पिढी शेती व्यवसायाकडे वळत असून, ऊस उत्पादनासाठी लागणारा वाढता खर्च, मजुरी, खते आणि वाहतूक यांचा विचार कारखानदारांनी करणे आवश्यक आहे. त्यामुळे चालू हंगामात प्रतिटन किमान चार हजार रुपये दर देण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी शितोळे यांनी १० नोव्हेंबर रोजी दिलेल्या निवेदनातून केली आहे.

प्रियांका नरसाळे यांची भौतिकशास्त्रात पीएच.डी

बापुसाहेब नरसाळे यांच्या धर्मपत्नी आहेत. त्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत जिद्द, चिकाटी आणि अभ्यासातील सातत्याच्या जोरावर उच्च शिक्षणाची वाटचाल यशस्वीपणे पूर्ण केली. ग्रामीण भागातून शिक्षण घेत संशोधन क्षेत्रात पीएच.डी.पर्यंत मजल मारणे, ही त्यांच्या मेहनतीची आणि शैक्षणिक ध्येयाप्रती असलेल्या समर्पणाची पावती मानली जात आहे.

आमदार दातेंकडून अभिनंदन : दरम्यान, प्रियांका नरसाळे यांच्या यशाबद्दल आमदार काशिनाथ दाते यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. पीएच.डी.सारखी कठीण आणि प्रदीर्घ संशोधनाची कसोटी पाहणारी पदवी त्यांनी जिद्द, चिकाटी व अथक परिश्रमांच्या जोरावर प्राप्त केली, ही संपूर्ण पारनेर तालुक्यासाठी अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यांच्या यशामुळे गोरेगावच्या नावलौकिकात भर पडली असून ग्रामीण भागातील विद्यार्थिनींसाठी त्या निश्चितच प्रेरणादायी ठरतील. त्यांच्या पुढील शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील वाटचालीसाठी आमदार दाते यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

भूसंपादनातील त्रुटींवर नारायणगव्हाणकर आक्रमक

द्यावा तसेच परिसरातील अपघातांमध्ये नुकसान झालेल्या कुटुंबांना भरपाई मिळावी, अशा मागण्यांचे निवेदन सचिन बबन शेळके व समस्त ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे. मागण्यांची दखल न घेतल्यास २६ नोव्हेंबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मुंडन आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

ग्रामस्थांनी निवेदनातून आपली भूमिका स्पष्ट करताना विकासकामाला कोणताही विरोध नसल्याचे नमूद केले आहे. मात्र, विकासाच्या नावाखाली बाधित शेतकरी आणि जमीनधारकांवर अन्याय होता कामा नये. भूसंपादनाची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक, नियमबद्ध आणि न्याय्य पद्धतीने पार पडली पाहिजे, अशी त्यांची मागणी आहे. गट क्रमांक, उपहिस्से, प्रत्यक्ष क्षेत्रफळ, सातबारा उतारे आणि जमिनीचे नकाशे यांची संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संयुक्त फेरपडताळणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

पान १ वरून...

खा.लंके भट्टीतून तावून सुलाखून निघालेले नेतृत्व!

'खासदार लंके येऊन गेले' असे लोक सांगतात. ते हे सगळे कसे करतात, याचेच मला आश्चर्य वाटते, असे थोरात म्हणाले.

पहाटे चार वाजेपर्यंत फराळाचे आमंत्रण! : स्नेहमेळाव्याच्या आयोजनाचे आणि त्याच्या व्याप्तीचेही थोरात यांनी विशेष कौतुक केले. ते म्हणाले, फराळासाठी आमंत्रण देताना दुपारी बारानंतर तुमच्या आगमनापर्यंत या, असे सांगण्यात आले आहे. अगदी पहाटे चार वाजता आले तरी चालेल, असे खासदार काही कार्यकर्त्यांना सांगत होते. मात्र, पहाटे चार वाजेपर्यंत जागण्याची त्यांना सवयच आहे. असा कार्यक्रम मी यापूर्वी पाहिलेला नाही. एवढेच काय, जागरण-गोंधळाचा कार्यक्रम ठेवायला काही हरकत नव्हती, असे म्हणत त्यांनी उपस्थितांना हसविले.

दुष्काळाच्या संकटात सरकारने जबाबदारी घ्यावी : राज्यातील संभाव्य पाणीटंचाई आणि दुष्काळाच्या परिस्थितीवर भाष्य करताना थोरात यांनी सरकारसह लोकप्रतिनिधींनी जबाबदारीने काम करण्याची गरज व्यक्त केली. ते म्हणाले, महाराष्ट्र सध्या मोठ्या संकटातून जात आहे. अल निनोचा प्रभाव शंभर वर्षांनंतर जाणवत असल्याचे चित्र आहे. जून-जुलैमध्ये पाऊस झाला म्हणून काही प्रमाणात पाणी उपलब्ध आहे; मात्र आजच पारनेर तालुक्यात शंभर टँकर सुरू आहेत. यावरून परिस्थितीचे गांभीर्य लक्षात येते.

सरकार म्हणून सरकारने आपली जबाबदारी घेतलीच पाहिजे. मात्र, खासदार म्हणून नीलेश लंके यांनाही या संकटाच्या काळात जबाबदारी घ्यावी लागेल. सरकारकडून मिळणाऱ्या पाच हजार रुपयांच्या मदतीवर भागणार नाही. सरकारने जनतेच्या पाठीशी उभे राहून त्यांना ताकद दिली पाहिजे. कोरोनाच्या संकटानंतर वेगळ्या स्वरूपातील दुसरे मोठे संकट आपल्यासमोर उभे आहे. अशा परिस्थितीत जनतेला आधार देणे महत्त्वाचे आहे. तुमचे खासदार तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतील, असा मला विश्वास आहे, असे थोरात यांनी सांगितले.

जिल्हा बँकेत नीलेश लंकेंची पहिली एन्ट्री लक्षवेधी

झाली. या पार्श्वभूमीवर गुरुवारी जिल्हा सहकारी बँकेच्या बैठकीसाठी खासदार लंके यांनी लावलेली उपस्थिती महत्त्वाची मानली जात आहे. बैठकीत केवळ प्रोसिडिंग बुकवर स्वाक्षरी करून बाहेर पडणे आणि त्यानंतर मानधनाचे पाकीटही स्वीकारण्यास नकार देणे, या दोन्ही बाबींमुळे त्यांची जिल्हा बँकेतील पहिलीच उपस्थिती चर्चेचा विषय ठरली. निवडणुकीत विजय मिळविल्यानंतर जिल्हा बँकेच्या राजकारणात लंके यांची पुढील भूमिका काय असणार, याबाबत आता उत्सुकता निर्माण झाली आहे.

काँग्रेसच्या 'फेक नॅरेटिव्ह'ला रस्त्यावर उतरून उत्तर देणार! : कार्यकर्त्यांनीही तेवढ्याच ताकदीने उत्तर देण्याची गरज आहे. अहिल्यानगरमधील हा मोर्चा राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष वेधणारा ठरला पाहिजे, असे नियोजन करण्याचे आवाहन राम शिंदे यांनी केले.

दरम्यान, जिल्हा सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल डॉ. सुजय विखे पाटील यांचा पक्षाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या पदाच्या निवडीचे श्रेय सर्व ज्येष्ठ नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या योगदानाला जाते, अशी भावना डॉ. विखे यांनी व्यक्त केली. बैठकीचे प्रास्ताविक शहराध्यक्ष अनिल मोहिते यांनी केले.



हॉटेल सुप्रिमजवळ गावठी कट्ट्यासह तरुण जेरबंद

आणि काडतूस पंचांसमक्ष जप्त केले.

याप्रकरणी सुपा पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३८२/२०२६ अन्वये भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ व ७/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयित तरुणाकडे हे शस्त्र कोठून आले, त्याने ते कोणत्या उद्देशाने जवळ बाळगले होते, यासह अन्य बाबींचा पुढील तपास पोलिसांकडून केला जात आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीषकुमार वमने आणि सुपा पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक ज्योती गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाईत सहायक फौजदार विजयकुमार विठेकर, पोलीस हवालदार अशोक मरकड, संदीप पवार, माळवदे, पोलीस नाईक यशवंत ठोंबरे, बडे, पोलीस कॉन्स्टेबल सातपुते, भांडवलकर, दिवटे, गायकवाड, महिला पोलीस कॉन्स्टेबल शिंदे तसेच होमगार्ड काळे व शेटे यांनी सहभाग घेतला.

अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधात पोलिसांनी केलेल्या या कारवाईची परिसरात चर्चा सुरू आहे.

वाचकांच्या लेखणीतून



गरिबांची दिवाळी

इक शजर आंगन में ऐसा भी लगाना चाहिये।
जिसका साया दूसरों के घर में जाना चाहिये।।

आपल्या अंगणात झाड लावले तर त्याच्या सावलीचा लाभ आपल्या शेजाऱ्यालाही झाला पाहिजे.

गोरगरीब जनता एक वेळच्या भोजनाला मोताद असताना त्यांनी आपल्या जीवनातील आनंदाची दिवाळी कशी काय साजरी करावी? नेमक्या याच सामाजिक उणिवेतून आणि जाणिवेतून निघोजचे माजी सरपंच संदीप पाटील वराळ यांनी जनसेवा फाऊंडेशनची मुहूर्तमेढ रोवली. पण त्यांचे दुर्दैवी निधन झाले. त्यानंतरही फाऊंडेशनचे विद्यमान अध्यक्ष सचिन पाटील वराळ आणि त्यांचे सहकारी यांनी गरिबांची दिवाळी हा उपक्रम चालू ठेवला आहे. संदीप पाटील वराळ जनसेवा फाऊंडेशनच्या वतीने गरिबांची दिवाळी हा सामाजिक कार्यक्रम गेल्या ९ नोव्हेंबरच्या सोमवार रोजी निघोजच्या कपिलेश्वर हॉलमध्ये पार पडला. या उपक्रमाचे हे तेरावे वर्ष आहे. फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष संदीप पाटील वराळ यांच्या प्रतीमापूजनाने या कार्यक्रमाची सुरुवात झाली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिरूर तालुक्याचे माजी आमदार पोपटराव गावडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून येथील कन्हैया डेअरीचे मच्छिंद्र लंके हे होते.

आपल्या अध्यक्षीय भाषणात गावडे म्हणाले, संदीप पाटील वराळ जनसेवा फाऊंडेशनचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे. निघोजचे माजी सरपंच किसन पाटील वराळ यांचा राजकारण करता करता समाजसेवेचा वसाही त्यांच्या घराण्यात चालत आला आहे. तोच वसा फाऊंडेशनचे विद्यमान अध्यक्ष सचिन पाटील वराळ यशस्वीपणे चालवीत आहेत.

गरिबांची दिवाळी या उपक्रमासाठी गावातील देणगीदारांनी सढळ हाताने आर्थिक आणि ठोस वस्तूंच्या स्वरूपात मदत केली त्यांचे मी आभार मानतो अशी भावना व्यक्त करून फाऊंडेशनचे अध्यक्ष सचिन वराळ यांनी आपल्या मनोगतात फाउंडेशनच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतला. कार्यक्रम पार पाडण्यात संस्थेचे कार्यकर्ते, पत्रकार आणि व्यासपीठावरील मान्यवर यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार पोपटराव गावडे यांच्या मार्गदर्शन आणि आशिर्वादाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी पंचायत समिती सदस्य दिनेश बाबर, व्यापारी असोशिएशनचे अध्यक्ष बबनराव तनपुरे, शिवाजी डेरे, ह.भ.प.श्रीहरी पवार महाराज, ज्येष्ठ पत्रकार आणि साहित्यिक नाना ढवळे, पत्रकार दत्ता उनवणे आणि पंकज कारखिले यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या सर्व वक्त्यांनी फाऊंडेशनच्या सामाजिक कार्याबद्दल गौरवोद्गार काढले. या उपक्रमातून गोरगरीब महिलांना साड्या, मिठाईचे पुडे, श्रीखंडाचे डबे वाटण्यात आले. विशेष म्हणजे निघोज येथील कन्हैया डेअरीतर्फे या उपक्रमासाठी दरवर्षी शंभर किलो श्रीखंड विनामूल्य पुरविण्यात येते. यासाठी ते धन्यवादास नक्कीच पात्र आहेत. दिवाळी म्हणजे दिव्यांचा, प्रकाशाचा सण. उर्दू शेरात सांगितल्याप्रमाणे या दिवाळसणाच्या आनंदाच्या प्रसंगी धनवानांच्या घरातला आनंदाचा प्रकाश गोरगरिबांच्या घरातही पोहोचावा, हा सद्विचार या उपक्रमापाठी आहे. त्यासाठी संदीप पाटील वराळ जनसेवा फाऊंडेशन, निघोज यांच्या या सामाजिक उपक्रमाला आपण धन्यवाद दिले पाहिजेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरद ठुबे, निलेश घोडे, राहुल वराळ आणि अस्लम इनामदार यांनी सुंदर तऱ्हेने पार पाडले.

- नाना ढवळे, निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर. ८२८६९१३२२३,

42 वर्षांनंतर पाझर तलावाच्या दुरुस्तीला हालचाली

'पारनेर दर्शन'च्या बातमीचा इम्पॅक्ट; वृत्त प्रसिद्ध होताच प्रशासनाची धाव

अधिकाऱ्यांकडून वैद्य वस्तीतील तलावाची प्रत्यक्ष पाहणी; दुरुस्ती व खोलीकरणाचा प्रस्ताव तयार करण्याची ग्वाही

पारनेर : प्रतिनिधी

लोकहिताचा प्रश्न प्रभावीपणे मांडला, तर प्रशासनाला त्याची दखल घेण्यास भाग पाडता येते, याचा प्रत्यय पारनेरमध्ये पुन्हा एकदा आला आहे. गेल्या तब्बल ४२ वर्षांपासून दुरुस्तीच्या प्रतीक्षेत असलेल्या वैद्य वस्ती येथील पाझर तलावाच्या प्रश्नाला दैनिक 'पारनेर दर्शन'ने वाचा फोडली. या वृत्ताची प्रशासनाने तातडीने दखल घेत अवघ्या २४ तासांच्या आत संबंधित अधिकाऱ्यांनी तलावाची प्रत्यक्ष पाहणी केली. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या तलावाच्या पुनरुज्जीवनाच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

११ नोव्हेंबरच्या वृत्ताची प्रशासनाकडून दखल

लोकहिताचा प्रश्न प्रभावीपणे मांडला, तर प्रशासनाला त्याची दखल घेण्यास भाग पाडता येते, याचा प्रत्यय पारनेरमध्ये पुन्हा एकदा आला आहे. गेल्या तब्बल ४२ वर्षांपासून दुरुस्तीच्या प्रतीक्षेत असलेल्या वैद्य वस्ती येथील पाझर तलावाच्या प्रश्नाला दैनिक 'पारनेर दर्शन'ने वाचा फोडली. या वृत्ताची प्रशासनाने तातडीने दखल घेत अवघ्या २४ तासांच्या आत संबंधित अधिकाऱ्यांनी तलावाची प्रत्यक्ष पाहणी केली. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या तलावाच्या पुनरुज्जीवनाच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

पाहणीदरम्यान अनिल वैद्य यांनी अधिकाऱ्यांना या तलावाची ऐतिहासिक माहिती दिली. तसेच जिल्हा भूमी संपादन अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथील तलावासंदर्भातील जुनी कागदपत्रेही उपलब्ध करून दिली. सन १९८४-८५ मध्ये बांधण्यात आलेल्या 'तळ्याचा तलाव' या पाझर तलावाची सध्याची अवस्था, त्याची उपयुक्तता आणि दुरुस्तीची आवश्यकता याबाबत अधिकाऱ्यांना माहिती देण्यात आली.

सांडवा, भिंतीची दुरुस्ती आणि गाळ काढण्याचा प्रस्ताव

- तलावाच्या सांडव्याची व भिंतीची दुरुस्ती करण्याबरोबरच तलावातील गाळ काढणे आणि खोलीकरण करण्यासाठी आवश्यक सर्वेक्षण करण्यात येईल. त्यानंतर कामाचा प्रस्ताव तयार केला जाईल, अशी ग्वाही अधिकाऱ्यांनी दिली. मात्र, हा तलाव पारनेर नगरपंचायतीच्या हद्दीत येत असल्याने नगरपंचायतीचे आवश्यक ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करता येईल, असेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.



पाच वस्त्यांच्या शेतीसाठी पुनरुज्जीवन महत्त्वाचे

- या पाझर तलावावर परिसरातील पाच वस्त्यांमधील शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न अवलंबून आहे. तलावाची साठवण क्षमता वाढल्यास परिसरातील शेतीला मोठा आधार मिळू शकतो. त्यामुळे केवळ तलावाची दुरुस्ती नव्हे, तर गाळ काढून खोलीकरण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न मार्गी लागल्यास परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

नागरिकांच्या प्रयत्नांना पत्रकारितेची साथ

- प्रशासनाने वृत्ताची तातडीने दखल घेऊन प्रत्यक्ष पाहणी केल्याबद्दल अनिल वैद्य सर यांनी परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांच्या वतीने संबंधित अधिकाऱ्यांचे आभार मानले. एका जागरूक नागरिकाने उपस्थित केलेला प्रश्न, पत्रकार श्रीकांत चौरे यांनी त्याला दिलेला प्रभावी आवाज आणि दैनिक 'पारनेर दर्शन'ने केलेले वृत्तांकन यामुळे प्रशासनाचे लक्ष या महत्त्वाच्या प्रश्नाकडे वेधले गेले. 42 वर्षांपासून दुर्लक्षित असलेल्या तलावाच्या प्रश्नावर अवघ्या एका बातमीने प्रशासनाला हालचाल करायला लावली. लोकांच्या प्रश्नांना व्यासपीठ देणारी आणि प्रशासनाला उत्तरदायी बनविणारी पत्रकारिता किती प्रभावी ठरू शकते, याचे हे ठळक उदाहरण ठरले आहे.

भूसंपादनातील त्रुटींवर नारायणगव्हाणकर आक्रमक

26 नोव्हेंबरला जिल्हाधिकारी कार्यालयावर मुंडन आंदोलनाचा इशारा

नारायणगव्हाण : प्रतिनिधी

अहिल्यानगर–शिरूर रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी सुरू असलेल्या भूसंपादन प्रक्रियेतील कथित त्रुटी आणि अनियमिततेचा मुद्दा आता चांगलाच तापला आहे. भूसंपादनाच्या नोंदींमध्ये चुका, क्षेत्रफळाबाबत विसंगती, पात्र भूधारकांच्या जमिनीवर चुकीच्या नोंदी आणि मोबदला निश्चितीतील दिरंगाई होत असल्याचा आरोप करत नारायणगव्हाण येथील बाधित शेतकरी व ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करून भूसंपादन अभिलेखांची फेरपडताळणी करावी, प्रत्येक पात्र भूधारकाला न्याय्य मोबदला उर्वरीत पान ३ वर



अभिलेख दुरुस्तीची मागणी

- भूसंपादन अभिलेखांमध्ये काही पात्र खासगी जमिनींवर चुकीने 'महाराष्ट्र शासन' अशी नोंद झाल्याचा आक्षेप ग्रामस्थांनी घेतला आहे. अशा नोंदींची तातडीने तपासणी करून आवश्यक दुरुस्ती करावी. जमिनीच्या मालकी हक्कानुसार सर्व पात्र सहहिस्सेदारांची नोंद घेऊन कोणताही भूधारक मोबदल्यापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. भूमिअभिलेख विभागामार्फत प्रत्यक्ष जागेवर संयुक्त मोजणी करून रस्त्यासाठी संपादित होणारे क्षेत्र निश्चित करावे. तसेच बाधित जमिनीवरील घरे, पत्राशेड, झाडे, बोअरवेल आदी मालमत्तांचे नियमानुसार मूल्यांकन करावे. मोबदल्याची गणना नेमकी कोणत्या निकषांवर करण्यात आली, याचा सविस्तर तपशील संबंधितांना लेखी स्वरुपात द्यावा, असेही ग्रामस्थांनी म्हटले आहे.

कार्यवाही न झाल्यास 26 नोव्हेंबरला मुंडन आंदोलन

- भूसंपादनातील त्रुटी, मोबदल्याचा प्रश्न आणि अपघातग्रस्तांना न्याय मिळावा यासाठी ग्रामस्थांनी आता आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. निवेदनातील मागण्यांवर तातडीने कार्यवाही न झाल्यास गुरुवार, 26 नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर समस्त ग्रामस्थांच्या वतीने मुंडन आंदोलन करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी वैयक्तिक लक्ष घालावे. भूसंपादन, भूमिअभिलेख आणि संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक बोलावून सर्व तक्रारींची पडताळणी करावी. तसेच त्रुटी दूर करण्यासाठी निश्चित कालमर्यादा ठरवून बाधितांना न्याय द्यावा, अशी मागणी सचिन बबन शेळके व नारायणगव्हाणच्या ग्रामस्थांनी केली आहे. आता जिल्हा प्रशासन या निवेदनाची कितपत दखल घेते आणि आंदोलनापूर्वी प्रश्न मार्गी लावण्यासाठी कोणती पावले उचलते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

प्रियांका नरसाळे यांची भौतिकशास्त्रात पीएच.डी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून संशोधन पूर्ण

गोरेगाव : प्रतिनिधी



तालुक्यातील गोरेगाव येथील प्रियांका युवराज सुंबे (नरसाळे) यांनी भौतिकशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी संपादन करून शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून २८ ऑक्टोबर रोजी त्यांनी आपले संशोधन यशस्वीरीत्या पूर्ण केले. त्यांच्या या यशामुळे गोरेगाव गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून संपूर्ण पारनेर तालुक्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

प्रियांका नरसाळे या इंजिनिअर युवराज उर्वरीत पान ३ वर

पारनेरमध्ये प्राथमिक शैक्षणिक वाटचाल

- प्रियांका यांचे बारावीपर्यंतचे शिक्षण पारनेर येथील न्यू इंग्लिश ज्युनिअर कॉलेजमध्ये झाले. त्यानंतर न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, पारनेर येथून त्यांनी बी.एस्सी. पदवी प्राप्त केली. पुढील उच्च शिक्षणासाठी त्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची निवड केली. या विद्यापीठातून त्यांनी एम.एस्सी. आणि एम.फिल. या पदव्या संपादन केल्या. त्यानंतर भौतिकशास्त्र विषयात संशोधन सुरु ठेवत पीएच.डी.ची कठीण शैक्षणिक प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण केली.

ग्रामीण विद्यार्थिनींसाठी प्रेरणादायी यश

- पीएच.डी.सारखी प्रदीर्घ कालावधीची आणि संशोधनाची सखोल बांधिलकी मागणारी पदवी मिळविण्यासाठी सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत आणि जिद्दीची आवश्यकता असते. प्रियांका यांनी या सर्व कसोट्यांवर यशस्वी मात केली आहे. त्यांच्या यशामुळे ग्रामीण भागातील मुलींनाही उच्च शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात मोठी भरारी घेता येते, हा सकारात्मक संदेश मिळाला आहे. त्यांच्या या कामगिरीचे गोरेगावसह पारनेर तालुक्यातील शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातून कौतुक होत आहे.

बापटांच्या विचारांतून अन्यायाविरोधात लढण्याची प्रेरणा!

पारनेरमध्ये स्वातंत्र्यसेनानी सेनापती बापट यांची 146 वी जयंती उत्साहात; खासदार नीलेश लंके यांच्या हस्ते पुतळ्यास पुष्पहार अर्पण

पारनेर : प्रतिनिधी

थोर स्वातंत्र्यसेनानी, क्रांतिकारक आणि समाजसुधारक सेनापती पांडुरंग महादेव बापट यांच्या १४६ व्या जयंतीनिमित्त पारनेर येथील स्वातंत्र्यसैनिक सेनापती बापट स्मारक येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्य जनतेच्या हक्कांसाठी आयुष्यभर संघर्ष करणाऱ्या या महान क्रांतिकारकाच्या स्मृतींना पारनेर ग्रामस्थ आणि नगरपंचायत प्रशासनाच्या वतीने अभिवादन करण्यात आले. खासदार नीलेश लंके यांच्या हस्ते सेनापती बापट यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याचे स्मरण करत त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला. यावेळी नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी प्रियांका शिंदे, नगरसेवक योगेश मते, अर्जुन भालेकर, सुभाष शिंदे, भूषण शेलार, माजी नगरसेवक विशाल शिंदे, विजय डोळ, अमित जाधव, गणेश कावरे, बाळासाहेब शेटे, संदीप सोनवणे, घोडके शेठ यांच्यासह नगरपंचायत प्रशासनातील कर्मचारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



तालुक्यातील ऊस उत्पादकांना चार हजारांचा भाव द्या!

क्रांती शुगर व पराग कारखान्यांना राजेंद्र शितोळे यांचे निवेदन

अळकुटी : प्रतिनिधी

पारनेर तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना चालू गळीत हंगामात प्रतिटन किमान चार हजार रुपये ऊसदर द्यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे पारनेर तालुका उपाध्यक्ष राजेंद्र चंद्रराव शितोळे यांनी केली आहे. यासंदर्भात क्रांती शुगर व पराग साखर कारखान्यांनी तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

अतिरिक्त नफ्यात शेतकऱ्यांचा वाटा निश्चित करा

- साखरेची विक्री प्रतिकिलो 45 रुपयांपेक्षा अधिक दराने होत असल्यास अतिरिक्त नफ्यातील 70 टक्के हिस्सा शेतकऱ्यांना, तर उर्वरित 30 टक्के हिस्सा साखर कारखाना व्यवस्थापनाला मिळावा, अशी भूमिका शितोळे यांनी मांडली आहे. साखरेची किमान आधारभूत किंमत प्रतिकिलो 50 रुपये निश्चित करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

कोल्हापूरचा न्याय अहिल्यानगरलाही मिळावा

कोल्हापूर जिल्ह्यात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी प्रतिटन ३ हजार ९०० रुपये, त्यावर १०० रुपये व आणखी २०० रुपये, असा एकूण ४ हजार २०० रुपये ऊसदर मिळविला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांचा साखर उर्वरीत पान ३ वर

'आविष्कार' संशोधन स्पर्धेसाठी समर्थचे दोन विद्यार्थी पात्र

कर्जुले हर्या : प्रतिनिधी

विद्यार्थ्यांमधील संशोधनवृत्ती, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि नावीन्यपूर्ण संकल्पनांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, बेल्हे येथील दोन विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाचा विद्यार्थी आदित्य कांबळे आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग विभागाचा विद्यार्थी अथर्व थोरात यांची विद्यापीठस्तरीय 'आविष्कार' संशोधन स्पर्धेसाठी निवड झाली आहे. आपल्या संशोधन प्रकल्पांच्या माध्यमातून दोन्ही विद्यार्थ्यांनी



महाविद्यालयाच्या शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रातील कामगिरीत भर घातली आहे.

संशोधनवृत्तीला प्रोत्साहन देण्यासाठी मार्गदर्शन

विद्यार्थ्यांमध्ये केवळ अभ्यासक्रमापुरते ज्ञान मर्यादित न राहता त्यांना संशोधन, नवोपक्रम आणि प्रत्यक्ष समस्यांवर उपाय शोधण्याची प्रेरणा मिळावी, या उद्देशाने महाविद्यालयाच्या वतीने विशेष प्रयत्न करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या नावीन्यपूर्ण संकल्पनांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देणे, संशोधन प्रकल्पांची शास्त्रीय पद्धतीने मांडणी करणे आणि त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे यावर भर देण्यात आला. या मार्गदर्शनाच्या आधारे आदित्य कांबळे आणि अथर्व थोरात यांनी आपल्या संशोधन प्रकल्पांचे प्रभावी सादरीकरण केले. त्यातून त्यांची विद्यापीठस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून अभिनंदन

- विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्या सौ. स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा. राजीव सावंत, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नवनाथ नरवडे आणि प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर यांनी अभिनंदन केले. यावेळी संस्थेचे पदाधिकारी, विविध विभागांचे प्रमुख, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनीही दोन्ही विद्यार्थ्यांचे कौतुक करुन पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

प्रा. सचिन शेळके यांचे मार्गदर्शन

- या निवड प्रक्रियेत महाविद्यालयाचे शैक्षणिक व संशोधन समन्वयक प्रा. सचिन शेळके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संशोधन प्रकल्पांच्या तयारीपासून ते सादरीकरणापर्यंत त्यांनी विद्यार्थ्यांना आवश्यक सहकार्य केले. तसेच 'आविष्कार' स्पर्धेच्या नियोजनापासून समन्वयापर्यंतची जबाबदारीही त्यांनी यशस्वीपणे पार पाडली.

इंदिरा गांधी स्कूलचा उत्कृष्ट निकालाचा वारसा कायम

पारनेर : प्रतिनिधी

येथील आनंद मेडिकल अँड एज्युकेशनल फाउंडेशन संचलित इंदिरा गांधी नर्सिंग स्कूलने ए.एन.एम. आणि जी.एन.एम. अभ्यासक्रमांच्या परीक्षेत यंदाही उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई यांच्यामार्फत सन २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत स्कूलच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले. विविध वर्षांच्या परीक्षांमध्ये विद्यार्थिनींनी मिळविलेल्या या यशामुळे संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे, अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. सादिक राजे यांनी दिली.

ए.एन.एम.च्या विद्यार्थिनींची गुणांची बाजी

- ए.एन.एम. प्रथम वर्षाच्या परीक्षेत पूजा थोरात हिने 84 टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. कल्याणी पंडित हिने 78 टक्के, तर दीपा श्रीमंदीलकर हिने 73 टक्के गुण मिळविले. ए.एन.एम. द्वितीय वर्षात जुई यशवंत हिने 80 टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला. प्राची खिल्लारी आणि रेणुका इंगळे यांनी प्रत्येकी 74 टक्के गुण मिळवत यश संपादन केले.

ए.एन.एम. आणि जी.एन.एम.च्या विद्यार्थिनींचे घवघवीत यश



जी.एन.एम.मध्येही चमकदार कामगिरी

- जी.एन.एम. प्रथम वर्षाच्या परीक्षेत माहेश्वरी थोरात हिने 73 टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला. अलिशा शेख आणि सुजाता मदगे यांनी प्रत्येकी 70 टक्के गुण मिळविले. द्वितीय वर्षात तनुश्री सोनवणे हिने 81 टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. सोनाली गुंड हिने 78 टक्के, तर गायत्री रणसिंग हिने 76 टक्के गुण मिळविले. तृतीय वर्षाच्या परीक्षेत पल्लवी बोरगे आणि संध्या रेपाळे यांनी प्रत्येकी 72 टक्के गुण मिळवत संयुक्त प्रथम क्रमांक मिळविला. श्रद्धा जगदाळे हिने 71 टक्के गुण मिळवून यशाची परंपरा पुढे नेली.

ग्रामीण मुलींसाठी शिक्षणाची संधी

- पारनेरसारख्या दुष्काळी भागातील गरीब व गरजू कुटुंबांतील मुलींना आर्थिकदृष्ट्या सक्षम करुन स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने संस्थेने नर्सिंग शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन दिली. सन 2006 पासून ए.एन.एम. आणि सन 2023 पासून जी.एन.एम. अभ्यासक्रम सुरु करुन ग्रामीण विद्यार्थिनींना आरोग्यसेवा क्षेत्रात करिअर करण्याची संधी उपलब्ध करुन दिली आहे.
- गेल्या दोन दशकांत संस्थेच्या माध्यमातून जवळपास 400 ते 450 मुलींनी नर्सिंगचे शिक्षण पूर्ण करुन स्वतःच्या पायावर उभे राहत आपल्या कुटुंबाला आर्थिक आधार दिला आहे. या विद्यार्थिनींमुळे केवळ त्यांच्या कुटुंबांचेच नव्हे, तर पारनेर आणि परिसरातील आरोग्यसेवांचेही बळ वाढले आहे. खाजगी तसेच सरकारी रुग्णालयांमध्ये प्रशिक्षित परिचारिकांच्या माध्यमातून रुग्णांना सेवा मिळण्यास मदत होत आहे.